


दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २२९ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । रविवार २० /०९/२०२६ । पाने - ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी



१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

## एमडी प्रकरणाने खाकीच बदनाम

### तपास गुन्हे शाखेकडे, सीसीटीव्ही फुटेज गायब?



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील बहुचर्चित एमडी ड्रग प्रकरणाला आता नाट्यमय वळण मिळाले असून, या प्रकरणाच्या तपासाची दिशा थेट स्थानिक गुन्हे शाखेकडे वळविण्यात आली आहे. संगमनेर शहर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर विविध स्तरांतून प्रश्नचिन्ह उपस्थित होत असतानाच, तपास वरिष्ठ पातळीवरून काढून घेण्यात आल्याने पोलिस प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी संगमनेर दौऱ्यादरम्यान या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. सुरुवातीला तपासाची जबाबदारी शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्याकडे देण्यात आल्याची माहिती असताना, काही तासांतच तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. त्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात आले आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### खाकीवरील विश्वासाला तडा?

**पोलिसांचे ब्रीदवाक्य ‘सद्रक्षणाय खलनिग्रहणाय’ म्हणजेच सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचे निर्दालन. मात्र, एखाद्या नागरिकाला खोट्या गुन्ह्यात अडकविल्याचे आरोप जर पोलिसांवरच होत असतील, तर सामान्य नागरिकांनी पोलिसांवर विश्वास कसा ठेवायचा? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात संबंधित पोलिस अधिकाऱ्यावर अद्याप कोणतीही थेट कारवाई झालेली नसल्याने ही नागरिकांमध्ये नाराजी आहे.**

(पान २ वर)

## वीजेची तार दुकानावर कोसळली, गादी सेंटर जळून खाक

### पहाटेच्या आगीत गाद्या, कापूस व बेडचे साहित्य भस्मसात





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शहरातील बसस्थानकासमोरील स्टेट बँक कॉर्नर परिसरात शनिवारी पहाटे भीषण आग लागून ‘न्यू संगम गादी सेंटर’ हे गादीचे दुकान जळून खाक झाले. विजेच्या खांबाला वाहनाचा धक्का लागल्यानंतर विद्युत तारांमध्ये स्पार्क होऊन त्याची ठिणगी दुकानावर पडल्याने आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या आगीत दुकानातील गाद्या, कापूस, बेडवरील साहित्य तसेच अन्य साहित्य जळून मोठे आर्थिक नुकसान झाले.

इकबाल अमुल्लाह मन्सुरी यांच्या मालकीचे ‘न्यू संगम गादी सेंटर’ हे दुकान बसस्थानकासमोरील वर्दळीच्या परिसरात आहे. शनिवारी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास अचानक दुकानाच्या परिसरात आग लागली. प्राथमिक माहितीनुसार, एका वाहनाचा विजेच्या खांबाला धक्का लागल्याने खांबावरील विद्युत तारांमध्ये स्पार्किंग झाले. त्यानंतर विद्युत तारांमधून उडालेली ठिणगी दुकानावर पडल्याने आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

दुकानाची रचना पत्र्याची असून आत मोठ्या प्रमाणात गाद्या, कापूस, बेडचे साहित्य आणि अन्य ज्वलनशील वस्तू ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. ज्वलनशील साहित्यामुळे आगीचा भडका मोठ्या प्रमाणात उडाला आणि धुराचे लोट परिसरात पसरले. दुकानाशेजारीच किराणा दुकानासह इतर व्यावसायिक आस्थापना असल्याने आग आणखी पसरून मोठा अनर्थ होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

घटनेची माहिती मिळताच संगमनेर नगरपालिका अग्निशमन दल तसेच थोरात साखर कारखान्याच्या अग्निशमन यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, दुकानाचे शटर तत्काळ उघडता न आल्याने आतमध्ये धग वाढत राहिली. परिणामी दुकानातील गाद्या, कापूस आणि अन्य साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

अग्निशमन दलाच्या प्रयत्नांमुळे आग शेजारील दुकानांकडे पसरण्यापासून रोखण्यात आली. त्यामुळे परिसरातील अन्य व्यावसायिक आस्थापनांचे मोठे नुकसान टळले. मात्र, गादी सेंटरमधील साहित्य मोठ्या प्रमाणात जळून खाक झाल्याने दुकानदाराचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

दरम्यान, शहरातील वर्दळीच्या भागात विद्युत तारांची सुरक्षितता, खांबांची स्थिती आणि विद्युत यंत्रणेची नियमित तपासणी याबाबत या घटनेने पुन्हा गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. विद्युत तारांमध्ये स्पार्किंग होऊन व्यावसायिक दुकानाला आग लागल्याने भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणेने विद्युत व्यवस्थेची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिक व व्यावसायिकांकडून होत आहे.

## हक्काचे पाणी व वीजेच्या संघर्षासाठी तयार रहा - माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - निळवंडे धरण व कालवे आपण पूर्ण केले. आता कालव्यांना काँक्रिटीकरण करून करून पाणी पुढे नेले जात आहे. आपल्या काळामध्ये अकरा तास पूर्ण दाबाने वीज असायची. आता वीज बंद केली जात आहे. पाणी, वीज, रेल्वे या प्रश्नांवरती येथील लोकप्रतिनिधीने बोलले पाहिजे. मात्र ते कुणाच्यातरी नियंत्रणाखाली काम करत असल्याने बोलू शकत नाही. हे तालुक्याचे दुर्दैव आहे. पाण्यामुळे समृद्धी येत असून आपल्यालाच लढावे लागणार आहे. हक्काच्या पाण्यासाठी व सुरळीत वीजपुरवठा मिळाला पाहिजे याकरता संघर्षासाठी तयार रहा असे आवाहन राज्याचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी तालुक्यातील जनतेला केले असून यावर्षी साखर कारखाना व दूध संघ सर्वांची दिवाळी गोड करणार असल्याचे ते म्हणाले.



सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मा. आ. डॉ. सुधीर तांबे, बाजीराव पा. खेमनर, ॲड माधवराव कानवडे, व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, सौ. दुर्गाताई तांबे, रणजीतसिंह देशमुख, शंकरराव खेमनर, सुधाकर जोशी, डॉ. जयश्रीताई थोरात, बुवाजी बाबा पुणेकर, शरद नाना थोरात, मधुकरराव नवले, लहानभाऊ गुंजाळ, आर.बी राहणे, रामदास वाघ, गणपतराव सांगळे, कारखान्याचे संचालक संतोष हासे, इंद्रजीत थोरात, इंद्रजीत खेमनर, संपतराव गोडगे, डॉ तुषार दिघे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, ८०० टन मॅट्रिक टनावरून सुरू झालेल्या कारखान्याने ५९ वर्षात विस्तारीकरणासह डिस्टलेरी, इथेनॉल, वीज निर्मिती यातून अत्यंत यशस्वी वाटचाल केली आहे. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचे आदर्श तत्व तंतोतंत जपताना काटकसर पारदर्शकता हे कारखान्याचे वैशिष्ट्य राहिले आहे. कारखान्याबरोबरच दूध संघ, शैक्षणिक संस्था या सर्वांचे आदर्शवत काम सुरू आहे . हे सर्व यश प्रामाणिकपणामुळे आहे.

दूध संघ चांगला भाव देतो आहे. त्यामुळे खाजगीवाले चांगले भाव देतात. प्रत्येक संस्था उत्कृष्ट काम करते. निळवंडेचे पाणी आल्याने उसाचे क्षेत्र वाढले पाहिजे याचबरोबर एकरी शंभर टनेज ऊस उत्पादन होईल यासाठी शेतकऱ्यांनी काम करावे. कार्यक्षेत्रामध्ये ११ लाख ऊस निर्मिती होणे गरजेचे आहे. स्वतःचा ऊस आपण निर्माण केल्यास राज्यातील सर्वाधिक भाव कायम आपण देऊ. आपली चांगल्या कामाची परंपरा आपली राहिली आहे. बाहेरील शेतकरी, सभासद, ऊस उत्पादक यांचा मोठा विश्वास कारखान्यावर आहे. ऊस वाढीसाठी ऊस विकास मेळावे घेण्यात येत आहे.

चाळीस वर्षांमध्ये अविश्रांत कामातून तालुका प्रगतशील बनवला. राज्यातील पहिल्या पाच तालुक्यांमध्ये संगमनेरचा समावेश होतो आहे. मात्र कोणीतरी उठतो आणि काय केले असा सवाल विचारतो. निष्क्रिय मुले ही वडिलांना असाच सवाल विचारतात. त्यांनी काय केले ते पहा. तालुक्यामध्ये पाणी वीज रेल्वे हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्यावर नवीन लोकप्रतिनिधी एक शब्द बोलत नाहीये दुर्दैव आहे. आपल्या तालुक्याचा पाण्यासाठी संघर्ष आहे. १९८५ मध्ये जनतेने हक्काच्या पाण्यासाठीच आपल्याला निवडून दिले.

(पान ४ वर)










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# ‘सजदा’च्या सुफियाना सुरावटींनी सजली संगमनेरची संध्याकाळ

## संगमनेरचा सांस्कृतिक महोत्सव उंचीवर; संदीप पंचवटकरांच्या गायनाने जिंकली मने



संगमनेर, प्रतिनिधी

राजस्थान युवक मंडळ आणि मालपाणी उद्योग समूहाच्या वतीने सुरु असलेल्या ‘संगमनेर फेस्टिव्हलच्या तिसर्या दिवशी संगीताची पर्वणी ठरलेला ‘सजदा’ हा सुफियाना अंदाजातील संगीत सोहळा श्रोत्यांना अक्षरशः डोलवून गेला. सुफी संगीत, अध्यात्म आणि संगीताचा अनोखा संगम असलेला हा कार्यक्रम संगमनेरकर रसिकांसाठी अविस्मरणीय अनुभव ठरला.

गेल्या १८ वर्षांपासून संगमनेरचा सांस्कृतिक मानबिंदू ठरलेल्या संगमनेर फेस्टिव्हलच्या तिसर्या दिवशी प्रसिद्ध गायक संदीप पंचवटकर यांनी आपला सुरेल आवाज आणि दिलखुलास सादरीकरणाने उपस्थित श्रोत्यांच्या मनाचा ताबा घेतला. ‘सुकून के साथ.. करते हैं आगाज, दिल की बात.. सुफियाना अंदाज’ या उक्तीप्रमाणेच या कार्यक्रमाची सुरुवात एका भारावलेल्या वातावरणात झाली.

फिल्मी आणि गैर-फिल्मी सुफी गीतांची जादू या कार्यक्रमातून पाहायला मिळाली. संदीप पंचवटकर यांनी एकापाठोपाठ एक सरस फिल्मी आणि गैर-फिल्मी सुफी गीते सादर केली. त्यांच्या आवाजातील जादू आणि शब्दांची गहिरी अनुभूती उपस्थितांना मंत्रमुग्ध करुन गेली. ‘सजदों से जब मेरी जागे..’यासह इतर प्रसिद्ध सुफी रचनांवर उपस्थित संगमनेरकर रसिक अक्षरशः डोलत होते. त्यांच्या सुमधुर गायकीने संपूर्ण वातावरण सुफियाना रंगात न्हाऊन निघाले होते.

कलाकारांची सरस जुगलबंदी, उत्कृष्ट संगीत संयोजन यांचा सुरेफ मिलाफ अडीच तास रंगलेल्या या संगीत सोहळ्यात बघायला मिळाला. मुख्य संयोजक संदीप पंचवटकर यांच्यासह सहाय्यक कलाकार आशिष देशमूख, प्रवीण अय्यर, अमोल यादव आणि गायत्री डुकरे यांनी आपल्या सुरेल स्वरांनी प्रत्येक गाण्यात रंग भरले. सईद खान यांच्या उत्कृष्ट संगीत संयोजनाने आणि वादकांच्या तालाने कार्यक्रमाची रंगत वाढत गेली. राजस्थान युवक मंडळ आणि मालपाणी उद्योग समूहाच्या वतीने गेल्या सुमारे दोन दशकांपासून सुरु असलेल्या या स्तुत्य उपक्रमाने संगमनेरच्या सांस्कृतिक विश्वात नवा अध्याय जोडला गेला आहे. या सांस्कृतिक महोत्सवाच्या तिसर्या दिवशी आत्म्याचा आणि संगीताचा प्रवास घडवणारी ही ‘सजदा’ मैफल उपस्थितांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील अशीच होती.

संगमनेर फेस्टिव्हलचे प्रणेते, उद्योजक मनीष मालपाणी, कार्याध्यक्ष सागर मणियार, उपाध्यक्ष कल्पेश मर्दा, सचिव कृष्णा आसावा, खजिनदार वेणूगोपाल कलंत्री, दर्शन भंडारी, सीए शुभम राठी आदिंच्या हस्ते कलाकारांचा सन्मान करण्यात आला. आजच्या या संगीत सोहळ्याने संगमनेर फेस्टिव्हलची सांस्कृतिक उंची शिखरावर पोहोचवली.

# नान्नज दुमालाच्या चार खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड






युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, नान्नज दुमाला येथील चार विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. प्रवरानगर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत हे खेळाडू संगमनेर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. याबाबतची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे यांनी दिली.

संगमनेर महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर झालेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. यामध्ये सार्थक रमेश गिते याने १७ वर्षे वयोगटातील ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, तर १५०० मीटर धावण्यात द्वितीय क्रमांक मिळविला. प्राची विलास रामकर हिने १७ वर्षे वयोगटातील उंच उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. ईश्वरी सोमनाथ कोटकर हिने १४ वर्षे वयोगटातील गोळाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच हर्षदा नामदेव सुर्वे हिने १७ वर्षे वयोगटातील १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.

या यशाबद्दल सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्थेचे चेअरमन आ. डॉ. सुधीर तांबे, सेक्रेटरी सुमंत कोल्हे, संचालक बाबा खरात व बाबासाहेब कडनर, प्रशासन अधिकारी चेतन मुर्तडक, स्थानिक स्कूल कमिटीचे व्हा. चेअरमन विठ्ठल गायकवाड व सर्व सदस्य, मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच ग्रामस्थांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले असून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या सर्व खेळाडूंना क्रीडाशिक्षक मंगेश गडाख, बाळासाहेब पिंगळे व मच्छिंद्र पवार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर पडली असून त्यांचे कौतुक होत आहे.

# पान १ वरून - एमडी प्रकरणाने...

या प्रकरणात काशिद असद कुरेशी या तरुणाला एमडी ड्रग प्रकरणात अटक करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर समोर आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमुळे पोलिसांच्या कारवाईबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. संबंधित तरुणाला अडकविण्यासाठी त्याच्या वाहनात अमली पदार्थ ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात येत असून, या दाव्याच्या सत्यतेची निष्पक्ष आणि सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

तपास एलसीबीकडे वर्ग करणे हा केवळ तपासाचा प्रशासकीय निर्णय आहे की पोलिस दलातील अंतर्गत कार्यपद्धतीवर निर्माण झालेल्या गंभीर प्रश्नांची दखल, हे तपासातून स्पष्ट होणे गरजेचे आहे. दरम्यान ज्या संगमनेर बसस्थानक परिसरात ही कारवाई झाल्याचे सांगितले जात आहे, त्या परिसरातील दोन हॉटेल आणि एका दुकानातील मुख्य सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसल्याची माहिती समोर आल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. हे फुटेज नेमके कुणी डिलीट केले? ते तांत्रिक कारणामुळे गायब झाले की जाणीवपूर्वक हटविण्यात आले? त्यावर कुणाचा दबाव होता का? या सर्व बाबींची स्वतंत्रपणे चौकशी करण्याची मागणी होत आहे. तपासातील महत्त्वाचे पुरावे नष्ट झाले असतील तर त्याची जबाबदारी निश्चित करण्याचीही गरज आहे.

या कथित कारवाईविरोधात संगमनेर शहरातील अल्पसंख्याक समाजातील काही मान्यवरांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, दोषी आढळणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी करत मुख्यमंत्र्यांकडे दाद मागण्याचा इशारा दिला आहे. एकीकडे अमली पदार्थांविरोधात कठोर कारवाईची गरज असताना, दुसरीकडे पोलिसांच्या कारवाईवरच संशय निर्माण करणारे आरोप समोर येणे ही प्रशासनासाठी गंभीर बाब आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला केवळ तो ‘खाकी’तील असल्यामुळे संरक्षण मिळता कामा नये, अशी भावना व्यक्त होत आहे.

तपास एलसीबीकडे वर्ग झाला असला तरी आता खरा प्रश्न तपास कुठे पोहोचतो हा आहे. सीसीटीव्ही फुटेज, पोलिसांची कारवाई, जप्तीची प्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य जनतेसमोर येणार का? की तपासाचे गुऱ्हाळ सुरू ठेवून प्रकरणावर पडदा टाकला जाणार? संगमनेर पोलिसांवरील जनतेचा विश्वास कायम ठेवायचा असेल, तर या प्रकरणातील प्रत्येक आरोपाची पारदर्शक चौकशी करून दोषी कोण आहे हे स्पष्ट करणे अत्यावश्यक आहे. खाकीवरचा डाग आरोपांचा आहे की प्रत्यक्ष गैरप्रकाराचा, हे आता डउइच्या तपासातूनच स्पष्ट होणार आहे.

# थोरात कारखान्याचे ११ लाख मेट्रिक टनाचे गाळप उद्दिष्ट - माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पारदर्शक कामकाज व गुणवत्ता यामुळे थोरात कारखान्यावर सभासद, शेतकरी व कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादक यांचा मोठा विश्वास आहे. अगदी २०० किमी लांबीवरून ऊस आणून आपण चांगला भाव दिला आहे. आपल्या कार्यक्षेत्रात कमीत कमी ९ लाख मेट्रिक टन ऊस निर्माण होणे गरजेचे आहे. यावर्षी ऊस क्षेत्र वाढवण्याबरोबर एकरी टनेज वाढवण्यासाठी काम करणे गरजेचे असून या हंगामात कमी दिवसात जास्त गाळप करताना ११ लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवून काम करावे असे आवाहन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६- २७ या वर्षीच्या गळीत हंगामाच्या बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मा आमदार डॉ सुधीर तांबे, सौ कांचनताई थोरात, ॲड. माधवराव कानवडे, व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले ,बाबा ओहोळ, डॉ जयश्रीताई थोरात, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी ,आर बी राहणे, के के थोरात, अजय फटांगरे , संचालक संपतराव गोडगे, विनोद हासे ,सतीश वर्पे ,रामदास धुळगंड, विलास शिंदे, रामनाथ कुटे ,नवनाथ आरगडे, गुलाब देशमुख, अरुण वाकचौरे, अंकुश ताजणे ,कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर आदी उपस्थित होते.

थोरात कारखान्याचा बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभ



यावेळी श्री. व सौ. शोभाताई दिलीप नागरे, श्री. व सौ. दिपाली योगेश भालेराव, श्री. व सौ. अरुणा विजय राहणे, श्री. व सौ. कमलताई मदन आंबरे, श्री. व सौ. नंदाताई बंडू नाना भाबड यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.

यावेळी बोलताना मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचे आदर्श विचार आणि परमेश्वराच्या आशीर्वादाने कारखान्याची वाटचाल यशस्वी सुरू आहे. शेतकऱ्यांचा, सभासदांचा मोठा विश्वास कारखान्यावर आहे. यावेळेस कमी वेळेत जास्त गाळप करावे लागणार आहे. कालखंड कमी आहे हे मोठे संकटाचे उदाहरण आहे. या हंगामात अडचणी खूप आहेत. १५ ऑक्टोबरला सरकारने कारखाना सुरू करण्यास सांगितले आहे. पाऊस नाही, शेतकऱ्यांमध्ये तणावाची परिस्थिती आहे.

तालुक्यात विजेचा खेळ खंडोबा झाला आहे .पाणी पुढे वाहून चालले आहे. पाणी व विजेसाठी आपल्याला संघर्ष करावा लागणार आहे. ९ हजार मेट्रिक टन गाळप क्षमता करण्यासाठी विस्तारीकरणाचे काम करण्यात येणार आहे. दररोज ९ हजार मे टन गाळप होईल याकरता तयारी करावी लागणार आहे. चांगले गाळप झाले तर मोलासिस ,अल्कोहोल ,वीज निर्मिती मधून मोठी मदत मिळते. म्हणून प्रत्येकाने पूर्ण क्षमतेने काम करताना आपल्या कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त ऊस क्षेत्र निर्माण होईल आणि एकरी उत्पादन वाढेल याकरता काम करावे. याचबरोबर तालुक्यामध्ये ११ तास हक्काची लाईट मिळाली पाहिजे. ती मिळत नाही तरीही शेतकरी गप्प आहेत हे अत्यंत चिंतेची बाब आहे.

हक्काची पाणी आणि विजेसाठी आपण आवाज उठवला. डॉ जयश्रीताई थोरात यांनी मोठ्या आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर कालपासून वीज सुरळीत करण्यात आली याचा अर्थ पुरवठा जाणून-बुजून खंडित केला जातो. याबाबत आपल्याला संघर्ष करावा लागणार आहे.


## संगमनेर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन

महसूल निवास, शिवाजी पुतळ्याजवळ, संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर

**विशेष वसुली व विक्री अधिकारी** सहकार खाते, पुणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

नियम पोटनियम १०७ (११) (ड-१) स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

जा.क्र. ०७/२६/विवअ/म.स.का.क्र. १५६/स्थावर ताबा

### संत निवृत्तीनाथ महाराज ग्रामीण बिगरशेती सह. पत. मर्या., चिकणी

ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

१) उपनिबंधक सहकारी संस्था संगमनेर यांनी पारीत केलेला म.स.का.क्र.१०१ अन्वये वसुली दाखला क्र.२८७/२०१८,२९४/२०१८,२९८/२०१८,२९१/२०२४. दि.३१/१२/२०२५.

२) मा.विशेष वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम व १०७ अन्वये दिलेल्या नोटीस अनुक्रमे

अ) थकबाकी मागणी नोटीस १०७ (३) अन्वये दि.१६/२/२०२६ ब) जंगम जप्ती पुर्वी नोटीस (१०७ (५) अन्वये दि.२७/२/२०२६ ते /१७/३/२०२६

क) स्थावर जप्ती हुकुम १०७ (१०) अन्वये दि.८/६/२०२६. थकबाकी रक्कम जमा करणेस कसूर केल्यामुळे थकबाकी कर्जदाराला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. विशेष करून कर्जदार व जामिनदार नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत येते आहे की, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेची खाली सर्व करणाऱ्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील १०७ (१०) (११) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. २३/१०/२०२६ रोजी मालमत्तेचा ताबा घेण्यात येईल. ज्याअर्थी सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास **संत निवृत्तीनाथ महाराज ग्रा.बि. शेती सह. पत. मर्या., चिकणी, ता. संगमनेर, जि. अ. नगर** यांच्या कर्जाचा बोजा रक्कम असे एकुण वसुली खर्चास अधिन राहावे लागेल.

◆ स्थावर मिळकत ◆

| वसुली दा. क्र. व दि. | ज्याचे विरुद्ध दावा आहे त्याचे नांव | गावाचे / शहराचे नांव | सर्व्हे/घर इतर मालमत्ता गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे | चतुःसिमा |
|---|---|---|---|---|---|---|
| २८७<br>१२/१/२०२४ | कर्जदार - प्रल्हाद रामचंद्र वर्पे<br>दावा रक्कम १०३१००/-<br>दिनांक :- ३१/१२/२०२५<br>जामिनदार - विठ्ठल मुरलीधर भोर<br>जामिनदार- राजेंद्र रामनाथ वर्पे | चिकणी, ता. संगमनेर<br>चिकणी, ता. संगमनेर<br>चिकणी, ता. संगमनेर | ३१५<br>२३३ | ०.२९.५०<br>०.४८ | १.२५<br>२.६५ | नकाशा प्रमाणे |
| २९५<br>१२/१/२०२४ | कर्जदार - विठ्ठल मुरलीधर भोर<br>दावा रक्कम - १०६५०५/-<br>दिनांक - ३१/१२/२०२५<br>जामीनदार - प्रल्हाद रामचंद्र वर्पे<br>जामीनदार - दिलीप काशीनाथ मुटकुळे (मयत) | चिकणी, ता. संगमनेर<br>चिकणी, ता. संगमनेर<br>चिकणी, ता. संगमनेर | २३३<br>३१५ | ०.४८<br>०.२९.५ | २.६५<br>१.२५ | नकाशा प्रमाणे |
| २९३/२४<br>१२/१/२०२४ | कर्जदार - विजय पा. काशिद<br>दावा रक्कम - १०७३२/-<br>दिनांक - ३१/१२/२०२५<br>जामीनदार - गोरक्षनाथ नामदेव वर्पे (मयत)<br>जामीनदार - अंजनाबाई विष्णु वाघमारे | चिकणी, ता. संगमनेर<br>चिकणी, ता. संगमनेर<br>चिकणी, ता. संगमनेर | २५६<br>३५० | ०.३३.००<br>०.३९.०० | १.३८<br>१.७० | नकाशा प्रमाणे |
| ३१४/२०१८ | कर्जदार - इंदुबाई निवृत्ती कोकणे<br>दावा रक्कम - १०,२२९७/-<br>दिनांक - ३१/१२/२०२५<br>जामीनदार - राजेंद्र केशव मुटकुळे<br>जामीनदार - सतिष मोहन घुले | चिकणी, ता. संगमनेर<br>चिकणी, ता. संगमनेर<br>चिकणी, ता. संगमनेर | १०४<br>१०१<br>४६ | ०.३१<br>०.३८<br>३.३१.७५ | ०.७५<br>१.५५<br>१.३१ | नकाशा प्रमाणे |
| २९४<br>१२/०१/२०२४ | कर्जदार - जिजाबा निवृत्ती वर्पे<br>दावा रक्कम २२,२४,१०५ /-<br>दिनांक : ३१/१२/२०२५<br>जामिनदार- केरु विठोबा बिडवे<br>जामिनदार अंबादास आण्णा वर्पे | चिकणी, ता. संगमनेर<br>सायखिंडी, ता. संगमनेर<br>चिकणी, ता. संगमनेर | ३३७/४<br>४७/१<br>५१/५<br>४३५/१ | ०.८४<br>१.८६<br>१.००<br>३.२४ | १.३५<br>१.८०<br>--<br>०५.०० | नकाशा प्रमाणे |

* विशेष टिप- मा. विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे समन्स, नोटीस घेण्यास टाळाटाळ करणे, त्यास प्रतिबंध करणे, आदेश नाकारणे, वसुली कामी अडथळे निर्माण करणे. इ. बेकायदेशीर कृत्य आपणाकडून घडल्यास कायद्यानुसार आपणावर दंडात्मक कारवाई होवून, कैदेच्या शिक्षेची तरतुद आहे. याची थकबाकीदारांनी व जामिनदारांनी विशेष नोंद घ्यावी.

- स्थळ - संगमनेर
- दि. २३/१०/२०२६

सही/- **एस. एन. यादव**
विशेष वसुली व विक्री अधिकारी (मोबा. ९८२२१०११५६)



**श्री संगम ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, कासारा दुमाला**

**कार्यालय- विद्यानगर, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

रजि.नं.ए.एन.आर./एस.एन.आर./आर.एस.आर.(सी.आर) २४३५ रजि.ता.२७/३/१९९७

## श्री संगम ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या;

**कासारा दुमाला**, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

कार्यालय-विद्यानगर, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

### - वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस -

### (फक्त सभासदांकरिता)

श्री संगम ग्रामिण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. कासारा दुमाला, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **२९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा** रविवार दि. २७/९/२०२६ रोजी सकाळी १० वा. **संस्थेचे कार्यालय, विद्यानगर, संगमनेर येथे विद्यमान चेअरमन मा. श्री. किसन भाऊ हासे** यांचे अध्यक्षतेखाली पुढील विषयांचा विचार विनिमय करणे करिता आयोजित केली आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**सभेपुढे येणारे विषय**

दि.०८/०९/२०२६

१) मा.अध्यक्षसाहेब यांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.
२) मागील दि. २८/९/२०२५ रोजी झालेल्या अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून मंजूर करणे.
३) दि. ३१ मार्च २०२६ अखेरचा आर्थिक अहवाल ताळेबंद व नफा-तोटा पत्रके वाचून मंजुर करणे.
४) मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे.
५) सन २०२६-२०२७ सालाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व मागील अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
६) सन २०२५-२०२६ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
७) सन २०२६-२०२७ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षण करणे कामी लेखा परीक्षकाची नियुक्ती करणे.
८) सन २०२४-२०२५ दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
९) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांचे कर्ज जाहीर करणे.
१०) सभासद व कर्मचारी प्रशिक्षणाचे आयोजन करणेबाबत.
११) पोटनियम दुरुस्ती कार्यक्षेत्रात वाढ करणेबाबत.
११) मा.अध्यक्षसाहेब यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांची चर्चा करणे.

स्थळ-संगमनेर
दिनांक-०८/०९/२०२६

मा.संचालक मंडळाचे आदेशावरुन
**श्री. रावसाहेब सोन्याबापू हासे**
व्यवस्थापक

**टिप :-** १. कोरम अभावी सभेचे कामकाज तहकुब झाल्यास अर्धा तास थांबुन सभेचे कामकाज त्याच ठिकाणी त्याच दिवशी पूर्ण केले जाईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही. २. सभासदांना कोणत्याही प्रकारची माहिती सर्वसाधारण सभेमध्ये पाहिजे असल्यास तसेच प्रश्न किंवा सूचना करावयाच्या असतील त्यांनी दि.२२/०९/२०२६ रोजी दु.४.00 वा.संस्थेच्या कार्यालयात लेखी पाठवावेत. त्याच प्रश्नांची उत्तरे पंचकमिटीकडून दिले जाईल. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणारी नाही.
३. सन २०२५-२०२६ चे आर्थिक पत्रके संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.
४. **गुणवंत विद्यार्थी सत्कार इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये ८५%** चे पुढील गुण असणारे विद्यार्थ्यांनी आपली गुणपत्रिका (रिझल्ट) ची झेरॉक्स प्रत दि.२५/०९/२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात जमा करावी.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# मा. मंत्री थोरात यांच्या पाठपुराव्यातून ग्रामीण रुग्णालयाचे विस्तारीकरण

## घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात १०० बेडची विस्तारित इमारत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील नागरिकांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळावा याकरता तत्कालीन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयामध्ये १०० बेडची अत्याधुनिक इमारत उभी २०२२ मध्ये प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. त्या माध्यमातून व त्यांच्या पाठपुराव्यातून घुलेवाडी इमारतीचे काम सुरू असल्याचे जिल्हा परिषद सदस्य सिताराम राऊत यांनी म्हटले आहे.

याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात सिताराम राऊत यांनी म्हटले आहे की लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यातील नागरिकांना आरोग्याच्या अत्याधुनिक दर्जेदार सुविधा मिळावा याकरता आपल्या महसूल मंत्री पदाच्या काळामध्ये घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयामध्ये १०० बेडचे नवीन रुग्णालय मंजूर केले याकरता १३ ऑगस्ट २०२२ मध्ये या कामाला महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात प्रशासकीय मान्यता मिळवली होती.

त्यानंतर आमदार सत्यजित तांबे यांनीही हे रुग्णालय अत्यंत उत्कृष्ट दर्जाचे होण्यासाठी सातत्याने राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. त्या माध्यमातून हे रुग्णालय उभे राहत आहे. घुलेवाडी ग्रामस्थांनी ग्रामीण रुग्णालयासाठी ही जागा उपलब्ध करून दिली तेव्हा या ठिकाणी अद्यावत रुग्णालय व्हावे अशी मागणी केली होती. त्याच वेळेला भविष्यात या ठिकाणी आपण जिल्हा रुग्णालय करू असे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी ग्रामीण रुग्णालयाच्या उद्घाटन प्रसंगी दिले होते .व तदनंतर २०२२ मध्ये या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालयाला त्यांनी पाठपुरावा करून मान्यता दिली.

संगमनेर शहरामध्ये महिलांसाठी स्वतंत्र हॉस्पिटल व्हावे. याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनीच पाठपुरावा केला आहे. २०२० मध्ये या कामालाही मंजुरी मिळाली होती. घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाचा चेहरा मोहरा बदलताना या ठिकाणी प्रशस्त जागेवर नवीन १०० बेडचे अत्याधुनिक रुग्णालय उभे करण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला आहे. या प्रशासकीय मान्यता मिळवण्यामध्ये नवीन लोकप्रतिनिधीच्या कोणताही संबंध नाही. त्याचबरोबर पावसाळी अधिवेशनामध्ये आमदार सत्यजित तांबे यांनी घुलेवाडी व साकुर ग्रामीण रुग्णालयातील सुविधांबाबत विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता मीयानंतर आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनी हे काम प्रगतीपथावर असून आमदार तांबे यांच्या सूचनेतून चांगले रुग्णालय, डॉक्टर नर्स व प्रशिक्षित सर्व स्टाफ दिला जाईल असे सांगितले होते.

या इमारतीचे काम लवकरात लवकर होऊन नागरिकांना उत्कृष्ट व दर्जेदार आरोग्याच्या सुविधा मिळाव्या ही सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. असे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सिताराम राऊत यांनी म्हटले आहे..माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयांमध्ये १०० बेड साठी मंजुरी मिळाली असून नवीन अत्याधुनिक रुग्णालय उभे राहत असून प्रशस्त व अद्यावत कोर्टाच्या इमारतीप्रमाणे नवी इमारत घुलेवाडी गावच्या वैभवात भर टाकणार आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन नागरिकांना चांगल्या आरोग्याच्या सुविधा मिळतील असा विश्वास सरपंच सौ निर्मलाताई राऊत यांनी व्यक्त केला आहे.

# आध्यात्मिक विचारांतून समाजाला सकारात्मक दिशा - आ. अमोल खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सद्गुरु अण्णा महाराज यांनी अध्यात्मा सोबतच समाजसेवा, संस्कार आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या आध्यात्मिक विचारांमधून समाजाला सकारात्मक दिशा मिळत असून, त्यांचा सेवाभाव व संस्कारांची परंपरा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले

संगमनेर शहरानजीक गुंजाळवाडी येथील आश्रमात विश्वचैतन्य सद्गुरु नारायण उर्फ अण्णा महाराज यांचा द्वितीय स्मृतिदिन विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. श्री नारायण महाराज श्री दत्त देव स्थान सेवाभावी ट्रस्ट, श्री क्षेत्र नारायणपूर तसेच संगमनेर, अकोले व सिन्नर विभागातील दत्त सेवेकरी यांच्या वतीने या स्मृतिदिनाचे आयोजन करण्यात आले होते.

सद्गुरु अण्णा महाराज यांच्या आध्यात्मिक व सामाजिक कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा, संस्कारांचा आणि सेवाभावी कार्याचा समाजात प्रसार करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. सद्गुरुंच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री शंकर गायकर, पतित पावन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. एस. झेड. तथा सोपानराव देशमुख, दिलीपराव शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते..

स्मृतिदिनानिमित्त आश्रम परिसरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांसाठी संगमनेर, अकोले, सिन्नर तसेच परिसरातील भाविक आणि दत्त सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. भाविकांनी सद्गुरु अण्णा महाराज यांच्या स्मृतींना अभिवादन करून दर्शन घेतले.

# गणेशोत्सवासाठी राजूर पोलिसांचा रूट मार्च

## संवेदनशील भागांत कडेकोट बंदोबस्त



छाया - विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी शनिवारी राजूर शहरातून पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आला.

उत्सव काळात पोलिस यंत्रणा सज्ज असल्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशानुसार विभागीय अधिकारी सोमनाथ वाकचौरे व पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राजुर बाजारपेठेतून रूट मार्चला सुरुवात झाली.

दत्त मंदिर, मुख्य बाजारपेठ, महादेव मंदिर पिचड साहेब बंगला रोडमार्गे पुन्हा राजूर पोलीस ठाणे असा मार्ग होता. रूट मार्चमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार ,पोलीस उपनिरीक्षक परसराम तागड पोलीस उपनिरीक्षक १७ पोलीस अंमलदार आणि २३ होमगार्ड, असे एकूण ४२ जवान सहभागी झाले. गणेशोत्सवात अनुचित प्रकार टाळण्यासाठी प्रमुख चौक, बाजारपेठ, संवेदनशील भाग व गणेश मंडळांच्या

परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. नागरिकांनी निर्भयपणे उत्सव साजरा करावा, तसेच अफवा व गैरसमजांवर विश्वास न ठेवता संशयास्पद बाब आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, गणेशोत्सव शांततेत साजरा करा गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करून शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे. डीजेवर बंदी असल्याने पारंपरिक वाद्यांचा वापर करावा.

नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी दिला.

# शिवकृपा पतसंस्थेचा रौप्यमहोत्सवी प्रवास

## २४ व्या वार्षिक सभेत विविध उपक्रमांची घोषणा

युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे - शिवकृपा नागरी सहकारी पतसंस्थेच्या २४ व्या वार्षिक सभेत संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यावेळी सभासदांना यंदा ११ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेच्या कार्यालयात झालेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष व सेक्रेटरी विश्वजीत कोंडे होते. पुणे जिल्हा पतसंस्था फेडरेशन प्रशिक्षण केंद्राच्या संयोजक निलाक्षी राऊत प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. माजी खजिनदार सुरेश तोलगेकर, अध्यक्ष डॉ. अमित बैरागी यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.

निलाक्षी राऊत यांनी महिलांनी पतसंस्थेच्या कारभारात सक्रिय सहभाग घ्यावा, बचत व आवर्तक ठेवींमध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करून संस्थेच्या आर्थिक बळकटीस हातभार लावावा, असे आवाहन केले. ज्येष्ठ संचालक सुरेश तोलगेकर यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेताना २००२ मध्ये २०० सभासद व २० हजार रुपये भांडवलावर सुरू झालेल्या संस्थेने २४ वर्षांत भरीव आर्थिक प्रगती केल्याचे सांगितले. संस्थेला सातत्याने ‘अ’ वर्ग मिळत असून, छोटे व्यावसायिक, फेरीवाले, भाजीविक्रेते व मजूर यांना घरकुलासाठी आर्थिक मदत केल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. हर्षद तोष्णीवाल यांनीही संस्थेच्या माध्यमातून अनेक सभासदांनी स्वतःचे घर उभारण्याचे स्वप्न पूर्ण केल्याचे सांगितले.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेची उलाढाल सुमारे ३ कोटी ५० लाख रुपये, सभासदसंख्या सुमारे ४०० असून संस्थेला ४ लाख ५० हजार रुपयांचा नफा झाला आहे. सर्व प्रकारच्या तरतुदी करून भागधारकांना ११ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती विश्वजीत कोंडे यांनी दिली. सभासदांनी भागभांडवल व ठेवी वाढविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

सभेत संस्थेच्या स्थापनेपासूनचे सभासद विलास बर्गे, डॉ. हर्षद तोष्णीवाल, विठ्ठल आजबे व सुरेश तोलगेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच कविता बैरागी, मृदुला कोटलीकर, मुक्ता फंड, राजुरकर, कृष्णा गिराम, व्यंकट चिल्मे, संपत वरे, पांडुरंग ढेबे, विठ्ठल फंड, बाळासाहेब काळे, सतीश डावरे, काळुराम रांजणे व कैलास आढाव यांचा गौरव करण्यात आला. परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. गार्डन ग्रुपचे सदस्य डॉ. कचरदास बैरागी, केरबा चरवड व अजय पवार यांचाही गौरव करण्यात आला.

संस्थेला लवकरच २५ वर्षे पूर्ण होत असल्याने रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तींचा गौरव आणि आरोग्य शिबिरासह विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

# तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत शार्दूल पवार प्रथम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दि. ग. सराफ विद्यालय, संगमनेर येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत मालपाणी विद्यालयाचा विद्यार्थी शार्दूल विजय पवार याने १४ वर्षे वयोगटात उत्तम कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या घवघवीत यशामुळे त्याची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेत शार्दूलने आपल्या उत्कृष्ट रणनीती व बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रतिस्पर्धकांवर मात करत अंतिम फेरीत बाजी मारली. या यशासाठी त्याला क्रीडा मार्गदर्शक सुनिल आढळ व दीपक राहणे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

शार्दूलच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, सर्व संस्था पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार तसेच मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांनी शार्दुल पवारचे विशेष कौतुक व अभिनंदन केले आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेतही शार्दूलने उत्कृष्ट कामगिरी करून विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, यासाठी त्याला शुभेच्छा देण्यात आल्या.

# लाल वादळ पुन्हा एकदा एकवटले ! प्रांत कार्यालयावर मोर्चा धडकला



युवावार्ता (प्रतिनिधी)

अंभोरे - वनजमिनीवरील अतिक्रमणाचे पट्टे कायम करावेत, वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच शेतकरी व फॉरेस्ट वाहुतदारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय किसान सभा व संगमनेर तालुका फॉरेस्ट वाहुतदार संघटनेच्या वतीने बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी संगमनेर तहसील व प्रांत कार्यालयावर भव्य मोर्चा निघाला होता.

हा मोर्चा लाल तारा कार्यालय, अकोले नाका, संगमनेर या ठिकाणाहून थेट नविन नगर रोड प्रांत कार्यालयावर धडकला. त्यानंतर शेतकरी, फॉरेस्ट वाहुतदार तसेच संबंधित नागरिकांनी विविध मागण्यांसाठी मोर्चाच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधले. मोर्चाच्या प्रमुख मागण्यांमध्ये वन जमिनीचे अतिक्रमित पट्टे कायम करावेत, २००६ सालच्या वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करताना इतर हक्कात नोंद न करता कब्जेदार सदरी नोंद करावी, २०२५ सालच्या प्रकरणांची चौकशी करावी, दुष्काळ जाहिर करावा आणि अतिक्रमणधारकांच्या पिक पाहणी सदरी नोंदी कराव्यात, अशा मागण्यांचा भडीमार घोषणांच्या माध्यमातून करण्यात आला यावेळी संपूर्ण प्रांत कार्यालय परिसर दणाणून सोडला. फॉरेस्ट अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण नियमित करताना ज्येष्ठ नागरिकांचा पुरावा ग्राह्य धरावा, स्वामिनाथन आयोगाची अंमलबजावणी करावी, ज्येष्ठ नागरिकांना दरमहा ५ हजार रुपये पेन्शन द्यावी, महागाई कमी करावी आणि शेतीसाठी वीजपुरवठा सुरळीत करावा, अशीही मागणी करण्यात आली.

याशिवाय कॉर्पोरेट धार्जिणे धोरण रद्द करावे आणि स्मार्ट मीटरचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी मोर्चाच्या माध्यमातून निवेदनाद्वारे नायब तहसीलदार यांचेकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी फ़ॉरेस्ट वाहुतदार संघटना अध्यक्ष कॉम्रेड ड ज्ञानदेव सहाणे, भारतीय कम्युनिस्ट पक्ष सेक्रेटरी कॉम्रेड प्रताप सहाणे, किसान सभा अध्यक्ष कॉम्रेड सयाजी कानवडे , सेक्रेटरी नारायण मेमाणे, जिल्हा अध्यक्ष कॉम्प्रेड बन्सी सातपुते, कॉम्रेड कारभारी उगले, कॉम्रेड निवृत्ती दातीर, कॉम्रेड भिका वाघ, कॉम्रेड गंभीरे, कॉम्रेड लहानू हासे, लक्ष्मण रोडे, फ़ॉरेस्ट वाहुतदार संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय किसान सभा आणि संगमनेर तालुका फॉरेस्ट वाहतदार संघटनेच्या वतीने आयोजित या मोर्चामुळे वनहक्क, शेती, वीज, पेन्शन व महागाईसह विविध प्रश्न पुन्हा एकदा प्रशासनाच्या चर्चेत आले आहेत. संबंधित मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आंदोलकांनी व्यक्त केली.

# संगमनेर येथे सद्गुरु नारायण महाराज यांचा द्वितीय पुण्यस्मरण सोहळा उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भारताच्या चारही दिशांना चार दत्त धामांची निर्मिती करणारे विश्व चैतन्य परमपूज्य सद्गुरु श्री नारायण महाराज तथा अण्णा महाराज यांच्या द्वितीय समाराधना दिनानिमित्त (पुण्यस्मरण) संगमनेर येथील आश्रमात सद्गुरू नारायण महाराज यांचे उत्तराधिकारी सद्गुरू टेंभे स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले होते. श्री नारायण महाराज श्री दत्त देवस्थान सेवाभावी ट्रस्ट, श्री क्षेत्र नारायणपूर व दत्त सेवेकरी यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा उत्साहात पार पडला.

संगमनेर कॉलेज समोरील निर्मलनगर, गुंजाळवाडी येथील सद्गुरु नारायण महाराज आश्रमात आयोजित या सोहळयात रुद्राभिषेक, भजन, सद्गुरूंचे जीवनदर्शन घडवणारी चित्रफित तसेच ह.भ.प. व्यंकटेश महाराज सोनवणे यांचे सुश्राव्य प्रवचन आयोजित करण्यात आले होते. महाआरतीनंतर उपस्थित हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या पुण्यस्मरण सोहळ्यास विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री शंकरजी गायकर, संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ पाटील, सौ. नीलमताई खताळ, पतित पावन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. एस. झेड. देशमुख सर, संगमनेर साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग घुले, दानशूर व ज्येष्ठ नागरिक दगूभाऊ गुंजाळ, पंचायत समितीचे माजी उपसभापती नवनाथ अरगडे, माजी जिल्हा परिषद सदस्य रामहरी कातोरे, अजय फटांगरे, आबासाहेब थोरात, राष्ट्रवादीचे दिलीप शिंदे, विहिंप अहिल्यानगर विभाग सहमंत्री विशाल वाकचौरे, विहिंपचे गोपाल राठी, बजरंग दल विभाग संयोजक कुलदीप ठाकूर आणि विहिंप अकोले तालुकाध्यक्ष गणेश धुमाळ यांच्यासह अकोले व संगमनेर प्रखंडातील बजरंग दल व विहिंपचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री नारायण महाराज दत्त देवस्थान सेवाभावी ट्रस्ट (नारायणपूर) संगमनेर, अकोले, सिन्नर विभागाचे प्रमुख श्री रवींद्र (बापू) देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व दत्त सेवेकरी व निर्मलनगर, गुंजाळवाडी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# संपादकीय...

## डिजिटल महाराष्ट्राच्या वाटेवर ग्रामीण नागरिकांची दमछाक

तंत्रज्ञानाने प्रशासन नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा मार्ग खुला केला आहे. शासकीय सेवा, अनुदाने, प्रमाणपत्रे, बँकिंग व्यवहार, आधार अद्ययावत करणे, विविध योजनांचे अर्ज, हयातीचे प्रमाणपत्र अशा अनेक सेवा आता ऑनलाइन झाल्या आहेत. कागदपत्रांच्या फेऱ्या कमी व्हाव्यात, वेळ वाचावा आणि पारदर्शकता वाढावी, हा डिजिटल व्यवस्थेमागचा मुख्य उद्देश आहे. मात्र प्रत्यक्ष ग्रामीण भागात चित्र काहीसे वेगळे दिसते. डिजिटल सुविधा वाढल्या असल्या तरी त्या वापरण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, साधने, इंटरनेट आणि तांत्रिक मदत सर्व नागरिकांना सहज उपलब्ध आहे का, हा प्रश्न आज गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील मोठा वर्ग आजही शेती, मजुरी, छोटे व्यवसाय आणि असंघटित क्षेत्रावर अवलंबून आहे. या नागरिकांसाठी स्मार्टफोन आणि इंटरनेट हे जीवनाचा अविभाज्य भाग झाले असले, तरी प्रत्येकाला ऑनलाइन शासकीय प्रक्रिया समजतेच असे नाही. अनेक ज्येष्ठ नागरिकांना मोबाइलवर अर्ज भरणे, ओटीपी टाकणे, कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे किंवा ऑनलाइन स्थिती तपासणे अवघड जाते. काही नागरिकांकडे स्मार्टफोन असला तरी इंटरनेटचा वेग, तांत्रिक अडचणी किंवा डिजिटल व्यवहाराचे अपुरे ज्ञान यामुळे त्यांना वारंवार दुसऱ्यांची मदत घ्यावी लागते. विशेष सहाय्य योजना, वृद्धापकाळ निवृत्तीवेतन, निराधार अनुदान, शिष्यवृत्ती, शेतकरी योजना अशा विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आता आधार अद्ययावत असणे, बँक खाते लिंक असणे, छझउख चरॉिळपस, मोबाइल क्रमांकाची नोंदणी आणि डिजिटल हयातीचे प्रमाणपत्र यांसारख्या प्रक्रिया आवश्यक होत आहेत. प्रशासनाच्या दृष्टीने या प्रक्रिया लाभार्थ्यांची अचूक ओळख आणि निधी थेट खात्यात पोहोचविण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. मात्र ग्रामीण लाभार्थ्यांसाठी हीच प्रक्रिया कधी कधी लाभ मिळविण्याच्या मार्गातील अतिरिक्त अडथळा ठरते. डिजिटल व्यवस्था ही सुविधा असली पाहिजे; ती अडथळा बनता कामा नये. एखाद्या वृद्ध व्यक्तीला केवळ डिजिटल प्रक्रिया पूर्ण करता न आल्यामुळे अनुदानापासून वंचित राहावे लागणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. अनेकदा नागरिकांना नेमकी अडचण कुठे आहे, हेही समजत नाही. आधारमध्ये माहिती चुकीची आहे की बँक खाते लिंक नाही, छझउख चरॉिळपस झालेले नाही की हयातीचे प्रमाणपत्र प्रलंबित आहे, याची माहिती मिळवण्यासाठी त्यांना कार्यालये, बँका, सेवा केंद्रे अशा अनेक ठिकाणी फेऱ्या माराव्या लागतात. यामुळे डिजिटल महाराष्ट्र उभारताना 'डिजिटल साक्षरता' हा विषय केंद्रस्थानी आणणे गरजेचे आहे. केवळ ऑनलाइन पोर्टल सुरू करणे म्हणजे डिजिटल परिवर्तन नव्हे. त्या पोर्टलचा वापर सामान्य नागरिकाला सहज करता येतो का, त्याची भाषा समजते का, आवश्यक कागदपत्रे कोणती याची स्पष्ट माहिती मिळते का आणि अडचण आल्यास तत्काळ मदत मिळते का, याचाही विचार झाला पाहिजे. ग्रामीण भागातील इंटरनेट सुविधा हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. अनेक गावांमध्ये नेटवर्कची समस्या अद्याप कायम आहे. ऑनलाइन अर्ज भरताना किंवा कागदपत्रे अपलोड करताना इंटरनेट खंडित झाले तर नागरिकांची प्रक्रिया अर्धवट राहते. काही वेळा ओटीपी वेळेत येत नाही. सर्व्हर डाऊन असतो. पोर्टलवर तांत्रिक अडचणी येतात. अशा वेळी नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होतात. डिजिटल सेवेचा उद्देश वेळ वाचवणे असताना प्रत्यक्षात त्यासाठी दिवसाचा रोजगार सोडून सेवा केंद्रात रांगेत उभे राहावे लागणे, ही विसंगती दूर होणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावर डिजिटल सहाय्य केंद्रे अधिक सक्षम करण्याची गरज आहे. प्रशिक्षित कर्मचारी, स्थानिक भाषेतील मार्गदर्शन, अर्जाची स्थिती तपासण्याची सुविधा आणि विविध योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध झाली तर नागरिकांची मोठी गैरसोय टाळता येईल.

## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. विपुल विश्वनाथ भुजबळ रा. गायत्री हौसिंग सोसायटी, नविन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर म्यु.घ.नं. -, सि. स. नं.- स.नं. १४५/८/५ या ठिकाणीमध्ये नर्सिंग होम चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. १८/०९/२०२६ मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

# विशेष सहाय्य योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी आधार अपडेट आवश्यक



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांसाठी आधार कार्ड असणे बंधनकारक आहे. त्यानुषंगाने तालुक्यातील विशेष सहाय्य योजनेचा लाभ मिळत नसलेल्या लाभार्थ्यांनी आपले आधार कार्ड अद्ययावत करून घ्यावे तसेच आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न करून घ्यावे, असे आवाहन पारनेर तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय अन्वये विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांकरिता आधार कार्ड असणे सक्तीचे राहील, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय लाभ घेत असलेल्या पात्र लाभार्थ्यांनी आधार अद्ययावत करणे आवश्यक आहे. आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न न केल्यामुळे लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला नाही, तर त्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची राहील असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

त्यानुसार विशेष सहाय्य योजनेचा लाभ मिळत नसलेल्या लाभार्थ्यांनी आधार कार्ड अद्ययावत करून घेण्याबरोबरच ते आपल्या बँक खात्याशी छझउख चरॉिळपस करून घ्यावे. आधार अद्ययावत न केल्यामुळे अथवा NPCI Mapping न झाल्यामुळे अनुदानाचा लाभ बंद झाल्यास त्यास संबंधित लाभार्थी जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

तसेच विशेष सहाय्य योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांनी वर्षातून एकदा Beneficiary Satyapan App द्वारे Digital Life Certificate (हयातीचे प्रमाणपत्र) काढून घेणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र न काढल्यामुळे लाभार्थ्यांचे अनुदान बंद झाल्यास त्यास संबंधित लाभार्थी जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी, असेही तहसीलदार सौंदाणे यांनी कळविले आहे.

## पान १ वरून - हक्काचे पाणी...

सलग आठ वेळेस मोठ्या मताधिक्याने निवडून आलो. निळवंडे धरण व कालवे आपण पूर्ण केले त्यावेळेस कोणी मदत केली नाही. आता कालव्यांना काँक्रिटीकरण करून पाणी पुढे नेले जात आहे. आपल्या काळामध्ये सलग अकरा तास वीज असायची आता विजेचा पूर्ण खेळखंडोबा झाला आहे. वीज जाते म्हणजे पाणी पुढे जाते. वाळू मुरूम यापेक्षा त्यांचे दुसरीकडे कुठे लक्ष नाही त्यामुळे आता पाण्यासाठी आपल्यालाच संघर्ष करावा लागणार आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टातून या सहकारी संस्था उभ्या केल्या आहेत. ह्या शेतकऱ्यांच्या सोन्याच्या संस्था आहेत. त्या उध्वस्त करण्याची भाषा ते लोक करत आहेत. हा सहकार मोडू पाहत आहेत. त्यांची भाषा उध्वस्त करण्याची आहे. ही संस्कृती आपल्याकडे कधीही नव्हती म्हणून तालुक्याच्या समृद्धीसाठी पाणी महत्त्वाचे असून पाणी व वीज मिळवण्यासाठी संघर्षासाठी तयार राहा असे आवाहन त्यांनी केले. याचबरोबर साखर कारखानदारी मधून दरवर्षी केंद्र व राज्य सरकारला सुमारे आठ हजार कोटी रुपये मिळतात. दहा वर्षातून एकदा या व्यवसायात अडचणी निर्माण होतात .अशा काळात सरकारने साखर कारखान्यांना मदत केली पाहिजे. कारखाने हे शेतकरी आणि ग्रामीण भागाशी निगडित असतात. काही निर्णय झाले आहे परंतु ते अपेक्षित नाही त्यामुळे सरकारने साखर कारखानदारीला मदत करावी असे आवाहनही त्यांनी राज्य सरकारला केले आहे.


SANGAMNER MEDICAL FOUNDATION AND RESEARCH INSTITUTE'S

**VAMANRAO ITHAPE COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMNET**

At. Velhale, Post. Rajapur, Tal. Sangamner, Dist. Ahlyanagar (MS)422605.
Affiliate to Savitribai Phule, Pune University, Pune & Recognized by Govt. of Maharashtra
Following posts is required to be filled (Non- Aided) in our college. Purely Ad-hoc Basis under SPPU.

| SN. | Post | No. of post | Subject | Cast & Category |
|---|---|---|---|---|
| 1 | Associate Professor | 03 | MBA | 1(SC), 1(VJ-A), 1(OPEN) |
| 2 | Assistant Professor | 08 | MBA | 1(SC), 1(VJ-A), 1(ST), 2(OPEN), 1(OBC), 1(EWS), 1(SEBC) |
| 3 | Professor | 01 | MCA | 1(OPEN) |
| 4 | Associate Professor | 03 | MCA | 1(SC), 1(VJ-A), 1(OPEN) |
| 5 | Assistant Professor | 08 | MCA | 1(SC), 1(VJ-A), 1(ST), 2(OPEN), 1(OBC), 1(EWS), 1(SEBC) |

·All Posts will be filled on Ad-hoc basis for AY2026-27
·Minimum Qualification & Pay scale and Service conditions are as prescribed by the UGC/AICT/State Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune
·Applications with attested copies of certificates should be send to mail Id: ithapemba2024@gmail.com with 3 days from the date of publication of this advertisement Qualifications, Experience as prescribed by SPPU & Trust Norms

Place: VICOEM
Date & Time: 26/09/2026 at 10.00 am to 02.00 pm at college Campus

President /Secretary
Sangamner Medical Foundation & Research Institutes


# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभासाठी उमेदवारांना मुलाखत प्रशिक्षण

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभाचे आयोजन दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी शेवगाव येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित औद्योगिक आस्थापना सहभागी होणार आहेत. या रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या गरजू उमेदवारांसाठी दि. २१ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव येथे पूर्व मुलाखत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणामध्ये रोजगार मेळाव्याची ओळख व करिअर जागरूकता, ठर्ीीाश/उत प्रभावी स्वरूपात तयार करणे, मुलाखत कौशल्ये व चेलझ खर्पीर्शीीळश्ु, व्यक्तिमत्व विकास व संवाद कौशल्य, कार्यस्थळ सज्जता व व्यावसायिक वर्तन, क्षेत्रनिहाय कौशल्य अभिमुखता तसेच अंतिम पूर्वतयारी व उरपवळवरींश उहशलज्ञश्रळीीं या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जास्तीत जास्त गरजू उमेदवारांनी या पूर्व मुलाखत प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी उमेदवारांनी https://forms.gle/vBTzRQKYBBuBT4em7 या लिंकवर नोंदणी करावी. रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीनंतर जागेवरच निवडपत्र/Offer Letter देण्यात येणार असल्याची माहिती शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव यांच्याकडून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
Kashinath Karabhari Avhad
NEW NAME AS
Kashinath Karbhari Avhad
ADD - Ganore
Tal- Akole, Dist - A. Nagar

**CHANGE IN NAME**
I hereby declare that **Shivani Prashant Waman** and **Shivani Sanket Kakade** refer to one and the same person, namely myself, and that they do not refer to two different persons.
**Shivani Prashant Waman**
At/po. Sangamner,
Dist. Ahilyanagar

**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट - २ जागा
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २ जागा
ओ. टी. टेक्निशियन - २ जागा
डायलिसिस टेक्निशियन - २ जागा
वॉर्ड मॅनेजर - १ जागा
नर्सिंग सुपरवाईझर - २ जागा
नाईट, मॉर्निंग, इव्हीनींग
**कुटे हॉस्पिटल**
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

**फ्लॅट विकणे आहे**
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड, पर्पल ब्लुम सोसायटी, साई पार्क रोड, फ्लॅट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर, 1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी
किचन ट्रॉली, बेड, सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGE MY MOTHER'S OLD NAME ASHALATA BHASKAR KAWADE (BEFORE NAME) TO NEW NAME AS ASHA BHASKAR KAWADE (AADHAR NO 203534714841)

**Declaration**
Rifleman G/d Name.
Devidas
Ekanath chakor
J B Paradise B/405
Nilegaon Nalasopara
E-West Sab district.
Vasai District .
Palghar State.
Maharashtra
Pin code.401203
Mobile.8668548416

**पाहिजेत**
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
**राजा ड्रेसेस**
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

**स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत**
**अकाऊंटंट मॅनेजर** अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॉर्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क - सांगळे साहेब - 9850194463 9503947084

**जाहीरात छोटी प्रतिसाद मोठा**

**आकर्षक पगारावर जागा भरणे आहे**
**सुपरवायझर**
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वत:ची टु व्हिलर असणे अवश्यक)
**ऑफिस असिस्टंट**
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
**उमंग इन्फ्राटेक**
7875455777

**पाहिजेत**
तरूणांसाठी सुवर्णसंधी
**राजवीर फार्मा**
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त होतकरू, तरूणांनी संपर्क साधावा
पुरूष – ४ जागा (वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
रिषभ गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन तहसील NA असलेली अर्धा गुंठा जागा त्वरीत विकणे आहे (दोन्ही बाजूने रस्ता)
पत्ता - कचेरी रोड, श्रमिक कॉम्पलेक्स (गोडावून) जवळ, अकोले , जि. अ.नगर
- संपर्क -
7385653323

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846







# गाजलेल्या गीतांचा नजराणा संगमनेरकरांना 'दिल से' आवडला

## 'संगमनेर फेस्टिव्हल'चा दुसरा दिवस; रहेमान म्युझिकने गाजवला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर फेस्टिव्हलमधील दुसरा दिवस गाजवला तो विख्यात संगीतकार ए.आर.रहमान यांच्या सदाबहार गीतांनी. या गाजलेल्या गीतांचा नजराणा संगमनेरकरांना 'दिल से' आवडला. सुरुवातीपासूनच कार्यक्रमाने रसिकांच्या मनाची पकड घेतली आणि उत्तरोत्तर हा कार्यक्रम रंगतच गेला.

वाद्यवृंद क्षेत्रातील दिग्गज कलावंत मिलिंद ओक यांच्या निश एंटरटेनमेंट्स या संस्थेची निर्मिती असलेला 'अ म्युझिकल ऑन ए.आर.रहमान - स्टोरी ऑफ अ जनरेशन' हा सुपरहिट नव्या आणि जुन्या गीतांचा संगीतमय नजराणा मालपाणी लॉन्सच्या आलिशान रंगभूमीवर सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला रसिकांनी क्षणोक्षणी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अक्षरशः डोक्यावर घेतले. रंगमंचावरील मोठ्या एलईडी पडद्यावर रहेमान यांच्या जीवनप्रवासाची दृश्ये, सिनेक्षेत्रातील मान्यवरांच्या मुलाखतींचे अंश, चित्रपटातील गीतांची निवडक दृश्ये आणि त्या पार्श्वभूमीवर गायक-गायिकांचे सादरीकरण, त्याला दिलखेचक नृत्यांची जोड यामुळे कार्यक्रमाने एक वेगळीच उंची गाठली. रहेमान यांच्या ज्या गीतांनी इतिहास घडविला, त्या गीतांच्या सादरीकरणाने रसिक कानसेन तृप्त झाले.

१९६७ मध्ये जन्मलेला ए.एस.दिलीप कुमार पुढे ए.आर.रहमान कसा झाला, याची माहितीही रसिकांना चित्रफितीतून मिळाली. वडिलांच्या अकाली निधनानंतर आईने अपार कष्ट करत रहेमानच्या अंगभूत गुणांना ओळखून प्रोत्साहन दिले. संगीताची जन्मजात देणगी लाभलेल्या रहेमानने छोट्या जिंगल्स बनविण्यापासून आपला प्रवास सुरू केला. हळूहळू कठीण दिवस सोपे होत गेले. या प्रवासात प्रसिद्ध दिग्दर्शक मणिरत्नम यांच्यासोबत त्यांची झालेली भेट भारतीय चित्रपटसंगीताच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरली. त्यानंतर मणिरत्नम आणि रहेमान यांची जोडी भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक गाजलेल्या दिग्दर्शक-संगीतकार जोड्यांपैकी एक ठरली. हा प्रवास निवेदकाने दृश्यांच्या सहाय्याने सुंदर रीतीने उलगडून दाखविला.

'दिल से'ची सुरुवात रोजा या मूळ तमिळ चित्रपटातील 'दिल है छोटा सा' या गीताच्या सादरीकरणाने झाली. ये हसीं वादियाँ, ये खुला आसमाँ, मुकाबला मुकाबला, एक हो गये हम और तुम, कहना ही क्या, आजा तुझमें समा जाऊँ रे, वन्दे मातरम, छैय्या छैय्या, आवारा भँवरे, घनन घनन, आ जा रे आजा रे, सुन मितवा, ईश्वर अल्लाह, माँ तुझे सलाम, कदम कदम, रंग दे बसंती अशी सार्वकालिक श्रेष्ठ, एकाहून एक सरस गाणी तितक्याच ताकदीने सादर करण्यात आल्याने रसिकांना तृप्तीची अनुभूती मिळाली.

मणिरत्नम, स्वतः ए.आर.रहमान, हरिहरन, प्रसिद्ध बासरीवादक नवीन कुमार, सुखविंदर सिंग, शेखर कपूर, रामगोपाल वर्मा, सुभाष घई, सिमी गरेवाल, आमिर खान, अलका याज्ञिक, आशुतोष गोवारीकर, उदित नारायण, कुमार सानू या दिग्गजांनी रहमान यांच्याविषयी सांगितलेले अनुभव पडद्यावर पाहताना रसिक एकाग्र झाल्याचे दिसत होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्ष सागर मणियार, उपाध्यक्ष कल्पेश मर्दा, सचिव कृष्णा असावा, खजिनदार वेणूगोपाल कलंत्री, सहसचिव दर्शन भंडारी, सहखजिनदार सीए शुभम राठी तसेच कार्यकारिणीचे सदस्य गिरीश मालपाणी, मधुसूदन नावंदर, राजकुमार बिहाणी, मनीष मणियार, नितेश लाहोटी, आशिष राठी, सुमित अट्टल, गौरव राठी, सचिन पलोड, प्रतीक पोफळे, ओमकार इंदाणी, पवन करवा, उमेश कासट, कल्याण कासट, गणेश लाहोटी, रोहित मणियार, सम्राट भंडारी, व्यंकटेश लाहोटी, प्रथम खटोड, सिद्धांत झंवर आणि शुभम असावा यांनी विशेष परिश्रम घेतले.

# टीईटी पेपरफुटीचा धक्कादायक खुलासा

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा च्या प्रश्नपत्रिका आग्र्यातील एका मुद्रणालयातून बुटाच्या सोलमध्ये लपवून बाहेर काढण्यात आल्या होत्या. ठाणे पोलिसांच्या सुमारे ३,५०० पानांच्या आरोपपत्रातून हा खुलासा झाला आहे. प्रश्नपत्रिका बाहेर काढण्याच्या बदल्यात आरोपींना ८ हजार देण्यात आले होते. तसेच, आग्रामध्ये जमिनीचे भूखंड देण्याचे आश्वासनही त्यांना देण्यात आले होते.

ठाणे पोलिसांनी शुक्रवारी भिवंडीच्या स्थानिक न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. यात सूत्रधार बिजेंद्र गुप्तासह १८ जणांना आरोपी करण्यात आले आहे. गुप्ताचे नाव यापूर्वी ओडिशातील एका प्रश्नपत्रिका गळती प्रकरणातही समोर आले होते. १६ आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर अशोक साव आणि प्रकाश मिसाळ फरार आहेत. २८ जून रोजी होणाऱ्या ढएढ परीक्षेच्या एक दिवस आधी प्रश्नपत्रिका फुटली होती. त्यानंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदने परीक्षा पुढे ढकलली होती.डीसीपी पवन बंसोड यांना माहिती मिळाली होती की, ३ जण भिवंडीतील एका व्यक्तीला परीक्षेचे पेपर विकण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यानंतर पोलिसांनी कोंगाव परिसरात आरोपींना पकडले. त्यांच्याकडून पेपरचे ४ संच मिळाले. तपासात महाराष्ट्र स्टेट कौन्सिल ऑफ एक्झामिनेशन च्या अधिकाऱ्यांनी हे पेपर अस्सल असल्याचे सांगितले. आरोपपत्रानुसार, पेपर आग्रा येथील महीम पटरन प्रायव्हेट लिमिटेड प्रिंटिंग प्रेसमधून लीक झाले होते. याच प्रेसमध्ये टीईटी परीक्षेचे गोपनीय पेपर छापले जात होते. १५ ते १७ जूनदरम्यान प्रेसमधील २ कर्मचारी आणि एका माजी कर्मचाऱ्याने पेपरची पाने दुमडून बुटांच्या तळव्यांमध्ये लपवली होती.

# ट्रम्पकडून 100 टक्के टॅरिफ कायद्याला मंजुरी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आता भारतावर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावू शकतात. ट्रम्प यांनी या विधेयकावर स्वाक्षरी करून त्याचे कायद्यात रूपांतर केले आहे. अमेरिकन संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या प्रतिनिधीगृहाने रशियाकडून सर्वाधिक तेल खरेदी करणाऱ्या पाच देशांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावणारे विधेयक मंजूर केले. या विधेयकाच्या बाजूने २६२ आणि विरोधात १५९ मते पडली. सिनेटने ऑगस्टमध्ये ८६-११ मतांनी हे विधेयक मंजूर केले होते. याचे अधिकृत नाव 'लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण क्ट ऑफ २०२६' असे आहे. रशियाकडून सर्वाधिक कच्चे तेल खरेदी करणाऱ्या पाच देशांच्या अमेरिकन यादीत चीन, भारत, स्लोव्हाकिया, हंगेरी आणि अझरबैजान यांचा सअमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी दर १८० दिवसांनी या यादीचे मूल्यांकन करतील. अमेरिकेने लावलेल्या १०० टक्के शुल्काबाबत, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते की देशाच्या हिताशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर, भारताने रशियाकडून स्वस्त कच्च्या तेलाची खरेदी वेगाने वाढवली.


# गणेश मंडळांच्या मिरवणुकीचे स्वागत; उत्कृष्ट मंडळांचा ढाल - ट्रॉफीने होणार गौरव

## शिवसेना शाखा क्र. ११ मेनरोडचा उपक्रम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शिवसेना शाखा क्र. ११, मेनरोड संगमनेर यांच्या वतीने गणेशोत्सव २०२६ निमित्त यंदा शहरातील सर्व गणेश मंडळांच्या मिरवणुकीचे उत्साहात स्वागत व सत्कार करण्यात येणार आहे. अशी माहिती माजी नगरसेवक कैलास वाकचौरे यांनी दिली.

शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून हा विशेष उपक्रम राबविण्यात येत असून, गणेशोत्सवातील विविध कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट गणेश मंडळांना ढाल, श्रीफळ व ट्रॉफी देऊन गौरविण्यात येणार आहे.





यंदाचा गणेशोत्सव संगमनेरच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरेला अधोरेखित करणारा ठरावा, यासाठी विविध प्रकारच्या देखावे व मिरवणुकींचा गौरव करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. गणेश मंडळांनी साकारलेले आकर्षक आरास व देखावे, भव्य व उत्कृष्ट गणेशमूर्ती, नेत्रदीपक विद्युत रोषणाई, समाजप्रबोधनपर देखावे, पौराणिक व ऐतिहासिक देखावे, पौराणिक-ऐतिहासिक नाट्यप्रयोग तसेच भव्य आणि शिस्तबद्ध मिरवणूक, शांतता व सामाजिक सलोखा राखणाऱ्या मंडळांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

या उपक्रमातून गणेशोत्सवातील कलात्मकता, सामाजिक संदेश, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा तसेच सार्वजनिक शिस्त यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

याशिवाय संगमनेर शहरातील कलाकार, मूर्तिकार, गायक, व्यंगचित्रकार, पत्रकार तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचाही स्वागत व सत्कार करण्यात येणार आहे. ज्येष्ठ समाजभूषण, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व बँकिंग क्षेत्रातील स्व. बिहारीलाल पंजाबी तसेच मेनरोड बाजारपेठेतील प्रतिष्ठित व्यापारी स्व. श्रीनिवास अट्टल यांच्या स्मरणार्थ हा गौरव सोहळा आयोजित करण्यात येत आहे.

शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित या उपक्रमासाठी कैलास वाकचौरे, बाळासाहेब डावखरे, दत्ता भांडुर्गे, अमित पवार, भैय्या तांबोळी, नारायण वाकचौरे, गोटूशेठ अट्टल, विजू नाना बापते, संजय वालवाणी, कृष्णा केसेकर, सुनील गायकवाड यांच्यासह शिवसैनिक व कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

तसेच समीर ओझा, अविनाश थोरात, शशी घोलप, गजेंद्र नाना अभंग, सुधीर वडनरे, काशिनाथ गोसावी, हरीश सारडा, राजाराम गुंजाळ, शाम करपे, अतुल पटेल यांच्यासह विविध कार्यकर्ते या उपक्रमास उपस्थित राहणार आहेत.

### दिनविशेष

१९९०: दक्षिण ओसेशिया — देशाने जॉर्जियापासून आपले स्वातंत्र्य घोषित केले.

१९७७: संयुक्त राष्ट्र — व्हिएतनामचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.

१९६५: बुर्कीची लढाई — १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान भारतीय सैन्याने डोगराई ताब्यात घेतले.

१९४६: कान्स फिल्म फेस्टिव्हल — पहिले कान्स फिल्म फेस्टिव्हल आयोजित केले गेले.

१९४२: युक्रेनमधील होलोकॉस्ट — दोन दिवसांत किमान ३ हजार ज्यू लोकांची हत्या केली.

१९४१: लिथुआनियामधील होलोकॉस्ट — लिथुआनियन नाझी आणि स्थानिक पोलिसांनी ४०३ ज्यू लोकांची सामूहिक हत्या केली.

१८९३: चार्ल्स ड्युरिया — यांनी त्याच्या भावासोबत पहिल्या अमेरिकन-निर्मित गॅसोलीन-चालित ऑटोमोबाईलची रोड-चाचणी केली.

१८५७: १८५७ चा राष्ट्रीय उठाव — ब्रिटिश (ईस्ट इंडिया कंपनीच्या) सैन्याने दिल्ली परत ताब्यात घेतली, आणि या उठावाचा अंत झाला.

### जन्म

१९४९: प्रयार गोपालकृष्णन — भारतीय राजकारणी, केरळचे आमदार (निधन: ४ जून २०२२ )

१९४९: महेश भट्ट — चित्रपट दिग्दर्शक

१९४६: मार्कंडेय काटजू — भारतीय वकील आणि न्यायमूर्ती

१९४४: रमेश सक्सेना — क्रिकेटपटू

१९४२: राजिंदर गोयल — भारतीय क्रिकेटपटू, रणजी ट्रॉफीमध्ये सर्वाधिक विकेट घेणारे (निधन: २१ जून २०२० )

१९३४: सोफिया ला ेरेन — इटालियन चित्रपट अभिनेत्री

१९३४: राजिंदर पुरी — भारतीय व्यंगचित्रकार आणि पत्रकार (निधन: १६ फेब्रुवारी २०१५ )

१९२५: राम (सातवा) — थायलँडचा राजा आनंद महिडोल तथा (निधन: ९ जून १९४६ )

१९२३: अक्किनेनी नागेश्वर राव — तेलुगू चित्रपटसृष्टीतील महान अभिनेते आणि निर्माता, भारतीय सिनेमातील प्रभावशाली व्यक्तिमत्त्व — पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री, दादासाहेब फाळके पुरस्कार (निधन: २२ जानेवारी २०१४ )

### मृत्यू

२०१५: जगमोहन दालमिया — भारतीय उद्योजक, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (BCCI) २६वे अध्यक्ष (जन्म: ३० मे १९४० )

२०१४: अशोक केळकर — भाषाशास्त्रज्ञ तसेच साहित्य समीक्षक — पद्मश्री, साहित्य अकादमी पुरस्कार (जन्म: २२ एप्रिल १९२९ )

१९९६: रुबेन कामांगा — झांबिया देशाचे १ले उपाध्यक्ष, सैनिक आणि राजकारणी (जन्म: २६ ऑगस्ट १९२९ )

१९९६: दगडू मारुती पवार — कवी, कथाकार, सामिक्षक, विचारवंत

१९७९: लुडविक स्वोबोदा — चेकोस्लोव्हेकियाचे राष्ट्राध्यक्ष

१९३३: ॲनी बेझंट — थिऑसॉफिस्ट आणि भारतीय स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या (जन्म: १ ऑक्टोबर १८४७ )

१९२८: नारायण गुरू — केरळमधील समाजसुधारक

१९१५: गुलाबराव महाराज — विदर्भातील सतपुरुष (जन्म: ६ जुलै १८८१ )

१८१०: मीर तकी मीर — ऊर्दू शायर




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**20 सप्टेंबर**

# युद्धाच्या भीषण छायेतून नव्या पर्वाकडे; १९७७ मध्ये व्हिएतनामचा संयुक्त राष्ट्रांमध्ये ऐतिहासिक प्रवेश

२० सप्टेंबर १९७७ हा व्हिएतनामच्या आधुनिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस ठरला. या दिवशी व्हिएतनामचा संयुक्त राष्ट्र संघटनेत (United Nations) अधिकृत प्रवेश झाला. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने व्हिएतनामला सदस्यत्व देण्याचा निर्णय घेतला आणि युद्धग्रस्त देशाने आंतरराष्ट्रीय समुदायात अधिकृत स्थान मिळवले.व्हिएतनामचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश हा केवळ एका देशाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेतील सहभागाचा प्रसंग नव्हता, तर अनेक दशकांच्या युद्धानंतर नव्या राष्ट्रीय पर्वाची सुरुवात होती. विसाव्या शतकाच्या मध्यात व्हिएतनामला फ्रेंच वसाहतवादी राजवटीविरुद्ध दीर्घ संघर्ष करावा लागला. त्यानंतर उत्तर आणि दक्षिण व्हिएतनाममधील संघर्ष आणि त्यात अमेरिकेच्या सहभागामुळे व्हिएतनाम युद्ध अधिक तीव्र झाले.१९७५ मध्ये सायगॉनच्या पतनानंतर व्हिएतनाम युद्धाचा शेवट झाला. त्यानंतर उत्तर आणि दक्षिण व्हिएतनामचे एकत्रीकरण झाले आणि १९७६ मध्ये 'सोशलिस्ट रिपब्लिक ऑफ व्हिएतनाम' या नावाने एकसंघ राष्ट्र अस्तित्वात आले. नव्या सरकारसमोर देशाची पुनर्बांधणी, आर्थिक विकास आणि आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत करण्याचे मोठे आव्हान होते.व्हिएतनामने संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्व मिळविण्यासाठी यापूर्वीही प्रयत्न केले होते. मात्र शीतयुद्धाच्या राजकारणामुळे त्याच्या सदस्यत्वाला अडथळे निर्माण झाले. अखेरीस १९७७ मध्ये परिस्थिती अनुकूल झाली आणि संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने व्हिएतनामच्या सदस्यत्वाला मंजुरी दिली.२० सप्टेंबर १९७७ रोजी व्हिएतनाम संयुक्त राष्ट्रांचा १४९ वा सदस्य बनला. या प्रवेशामुळे व्हिएतनामला जागतिक पातळीवर आपले मत मांडण्यासाठी अधिकृत व्यासपीठ मिळाले. शांतता, सार्वभौमत्व, विकास, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि युद्धोत्तर पुनर्बांधणी यांसारख्या विषयांवर व्हिएतनामला संयुक्त राष्ट्रांच्या विविध संस्थांमध्ये सहभागी होता आले.व्हिएतनामच्या प्रवेशाला त्या काळातील जागतिक राजकारणाच्या संदर्भात विशेष महत्त्व होते. अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांच्यातील शीतयुद्ध सुरू असताना व्हिएतनाम हा संघर्षाचा प्रमुख केंद्रबिंदू राहिला होता. युद्धानंतर संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्व मिळणे म्हणजे व्हिएतनामने आंतरराष्ट्रीय समुदायात औपचारिकपणे पुनःप्रवेश केल्याचे प्रतीक मानले गेले.सदस्यत्वानंतर व्हिएतनामसमोर युद्धामुळे उद्ध्वस्त झालेली अर्थव्यवस्था उभी करण्याचे आव्हान होते. पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि उद्योग क्षेत्राच्या पुनर्बांधणीसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची आवश्यकता होती. संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून विविध विकास कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचा मार्गही त्याच्यासाठी खुला झाला.पुढील काळात व्हिएतनामने आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये हळूहळू विस्तार केला. आर्थिक सुधारणा, परराष्ट्र धोरणातील बदल आणि जागतिक अर्थव्यवस्थेशी वाढता संपर्क यामुळे व्हिएतनामने आपले आंतरराष्ट्रीय स्थान मजबूत केले.आज व्हिएतनाम हा दक्षिण-पूर्व आशियातील महत्त्वाचा देश मानला जातो. १९७७ मध्ये संयुक्त राष्ट्रांमध्ये मिळालेले सदस्यत्व हे त्याच्या युद्धोत्तर इतिहासातील एक महत्त्वाचे पाऊल होते. दीर्घ संघर्षानंतर जागतिक समुदायात मिळालेली ही ओळख व्हिएतनामच्या राष्ट्रनिर्मितीच्या प्रवासातील ऐतिहासिक मैलाचा दगड ठरली.

# क्रिकेटविश्वातील प्रभावी नेतृत्व : जगमोहन दालमिया

## पुण्यतिथी विशेष

जगमोहन दालमिया हे भारतीय क्रिकेट प्रशासनातील अत्यंत प्रभावशाली व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात BCCI आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद अर्थात ICC यांच्या प्रशासनात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय क्रिकेटला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासह आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या व्यावसायिक विस्तारात त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.जगमोहन दालमिया यांचा जन्म ३० मे १९४० रोजी कलकत्ता (आताचे कोलकाता) येथे झाला. त्यांनी व्यवसाय क्षेत्रातही यश मिळवले. मात्र क्रिकेटविषयीची त्यांची आवड आणि प्रशासन कौशल्य यामुळे ते हळूहळू क्रिकेटच्या व्यवस्थापनात सक्रिय झाले. **बंगाल क्रिकेट असोसिएशन (CAB)** च्या माध्यमातून त्यांनी क्रिकेट प्रशासनात आपला ठसा उमटवला.दालमिया यांच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे भारतीय क्रिकेटचा आर्थिक प्रभाव वाढविण्यात त्यांनी बजावलेली भूमिका. १९८० आणि १९९० च्या दशकात भारतीय क्रिकेटची लोकप्रियता मोठ्या प्रमाणावर वाढत होती. दूरदर्शन, प्रायोजकत्व आणि प्रसारण हक्क यांच्या माध्यमातून क्रिकेटमध्ये मोठ्या आर्थिक संधी निर्माण होत होत्या. या बदलांचा प्रभावीपणे उपयोग करून भारतीय क्रिकेटला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम बनविणाऱ्या प्रशासकांमध्ये दालमिया यांचे नाव घेतले जाते.१९९७ ते २००० या कालावधीत त्यांनी ICC चे अध्यक्षपद सांभाळले. त्या काळात आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या प्रशासनात आशियाई देशांचा प्रभाव वाढविण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. विशेषतः भारत, पाकिस्तान आणि श्रीलंका या क्रिकेटप्रेमी देशांचे आर्थिक महत्त्व आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अधोरेखित करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.दालमिया यांच्या नेतृत्वाखाली १९९९ च्या क्रिकेट विश्वचषकाच्या आयोजनातही महत्त्वाची प्रशासकीय भूमिका पार पडली. भारतीय उपखंडात मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने आयोजित करण्यासाठी आवश्यक आर्थिक



आणि प्रशासकीय संरचना मजबूत करण्याच्या प्रक्रियेत त्यांचा सहभाग होता.BCCI मध्ये त्यांनी अध्यक्ष म्हणूनही महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. त्यांच्या नेतृत्वशैलीत आर्थिक शिस्त, व्यावसायिक दृष्टिकोन आणि क्रिकेटच्या व्यापक हिताचा विचार यांना महत्त्व होते. भारतीय क्रिकेटच्या वाढत्या लोकप्रियतेचा उपयोग क्रिकेटच्या पायाभूत सुविधा, खेळाडू आणि देशांतर्गत क्रिकेटच्या विकासासाठी करण्यावर त्यांनी भर दिला.२०१५ मध्ये त्यांनी पुन्हा BCCIच्या अध्यक्षपदाची धुरा स्वीकारली. मात्र त्यांचा हा कार्यकाळ फार काळ टिकला नाही. दीर्घकाळापासून असलेल्या आरोग्यविषयक समस्यांमुळे त्यांना कामकाजात अडचणी येत होत्या.२० सप्टेंबर २०१५ रोजी कोलकाता येथे वयाच्या ७५व्या वर्षी जगमोहन दालमिया यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रिकेट प्रशासनातील एक प्रभावशाली पर्व संपले.दालमिया यांचे योगदान केवळ BCCIच्या अध्यक्षपदापुरते मर्यादित नव्हते. भारतीय क्रिकेटची आर्थिक ताकद वाढविणे, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताचे महत्त्व अधोरेखित करणे आणि क्रिकेट प्रशासनाला अधिक व्यावसायिक स्वरूप देणे, या प्रक्रियेत त्यांची भूमिका महत्त्वाची होती.भारतीय क्रिकेटच्या जागतिक प्रभावामागील सुरुवातीच्या प्रशासकीय शिल्पकारांपैकी एक म्हणून जगमोहन दालमिया यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. त्यांच्या नेतृत्वामुळे भारतीय क्रिकेटला केवळ मैदानावर नव्हे, तर प्रशासन आणि आर्थिक क्षेत्रातही जागतिक पातळीवर मजबूत स्थान मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला.

**पाईल्सचा कायमचा उपाय !**
**वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?**
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी

सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com



**आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा**
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




## दैनिक युवावार्ता कार्यालयात मान्यवरांकडून गणेशाची आरती



संगमनेर - दैनिक युवावार्ता कार्यालयामध्ये विराजमान असलेल्या गणरायाची आरती संगमनेर येथील के. एम. हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर राजेंद्र मस्के, समन्वयक महेश वाव्हळ, तसेच मेडीकव्हर हॉस्पिटलच्या सेंटर हेड डॉ. स्नेहल गायके यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी दीपक जाधव, योगेश चौधरी, तुषार बडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे व संपादक सौ. सुशीला किसन हासे यांनी मान्यवरांचा सत्कार केला. यावेळी युवावार्ताचे संचालक आनंद हासे, कार्यकारी संपादक सुदीप हासे यांच्यासह युवावार्ता परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

## दुष्काळ बैठकीत नेत्यांचा काजू, बदामवर ताव

नादेंड (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात पावसाने ओढ दिल्याने दुष्काळाचे भीषण सावट पसरले आहे. शेतात उभी असलेली खरीप पिके डोळ्यांदेखत करपून गेली असून, बळीराजाच्या डोळ्यात अश्रू तरळत आहेत. शेतकरी सरकारकडून तत्काळ दुष्काळ जाहीर होण्याची आणि आर्थिक मदतीची चातकासारखी वाट पाहत असतानाच, नांदेडमध्ये राज्यकर्त्यांच्या असंवेदनशीलतेचे संतापजनक आणि चीड आणणारे दर्शन घडले आहे. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आयोजित उच्चस्तरीय बैठकीत चक्क मंत्री, खासदार आणि आमदारांसाठी काजू-बदामाचा शाही पाहुणचार ठेवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या बैठकीत लोकप्रतिनिधी काजू-बदामावर ताव मारत दुष्काळाची चर्चा करत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दुष्काळाची गंभीर चर्चा आणि लोकप्रतिनिधींचा शाही खुराक

नांदेड येथे मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवनात ही महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला पालकमंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, खासदार रवींद्र चव्हाण, परभणीचे खासदार संजय जाधव, खासदार रामराव वडकुते, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार कल्याण काळे, खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्यासह आमदार प्रताप पाटील चिखलीकर, हेमंत पाटील, चंद्रकांत नवघरे, बाबुराव पाटील कोहळीकर, कैलास पाटील, अमर राजूरकर आणि अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी उपस्थित होते. भाजपचे खासदार अशोक चव्हाण हे देखील ऑनलाइन पद्धतीने या बैठकीत सहभागी झाले होते.

मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमधील तीव्र पाणीटंचाई, करपलेली पिके आणि जनावरांच्या चाऱ्याच्या गंभीर समस्येवर चर्चा सुरू असतानाच, समोर ठेवलेल्या सुकामेव्याच्या (काजू-बदाम) वाटच्यांवर लोकप्रतिनिधींनी हात साफ करण्यास सुरुवात केली. परभणीचे खासदार संजय जाधव हे बदाम खाण्यात मश्गूल असल्याचा व्हिडिओ कॅमेऱ्यात कैद झाला. हा प्रकार लक्षात येताच राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी तत्काळ संबंधित कर्मचाऱ्यांना सूचना देऊन काजू-बदामाच्या प्लेट्स टेबलावरून हटवण्यास सांगितले.

## राजापूरला फिल्टर प्लांट असूनही अशुद्ध पाणी पुरवठा

### जलजीवन योजना साठवण तलाव गुणवत्तेची चौकशी करण्याची मागणी



**संगमनेर तालुक्यातील राजापूर येथील जल जीवन मिशन अंतर्गत साठवण तलावात कचरा पक्षी इतर घाण पडलेली आहे तेच अशुद्ध पाणी नागरिकांना नळाद्वारे दिले जात आहे या प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी आम्ही आमदार अमोल खताळ यांची भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे केली आहे तरी आमदार खताळ यांनी संबंधित विभागाला या गंभीर प्रकाराची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.**

**– संदेश देशमुख**
**शिवसेना महायुती, राजापूर**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राजापूर येथील जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले आहे. तळ्यावर पाणी शुद्धीकरणासाठी फिल्टर प्लांट बसविला असतानाही राजापूरकरांच्या नळाला अशुद्ध व कचरा युक्त पाणी येत आहे. आणि तेच पाणी पिण्याची दुर्दैवी वेळ जनतेवर आली आहे. या गंबीर प्रकाराकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. तरी संबंधित विभागाने या पाणीपुरवठा योजनेची गुणवत्ता तपासावी अशी मागणी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

संगमनेर तालुक्यातील राजापूर येथे कोट्यवधी रुपये खर्चून जल जीवन मिशन अंतर्गत साठवण तलाव तयार करण्यात आला आहे. या साठवण तलावावर फिल्टर प्लांट, जलवाहिन्यासुद्धा टाकण्यात आले आहे परंतु त्याची देखभाल, दुरुस्ती करण्याची जबाबदारी राजापूर ग्रामपंचायतीकडे असतानाही ती केली जात नाही. त्यामुळे जनतेवर अशुद्ध आणि कचरा युक्त पाणी पिण्याची वेळ आली आहे. या योजनेच्या कामांची गुणवत्ता, देखभाल आणि कार्यक्षमता तपासावी. तसेच पाणी पुरवठा नमुने अधिकृत प्रयोगशाळेत तपासून अहवाल सार्वजनिक करावा आणि फिल्टर प्लांट प्रत्यक्ष सुरू आहे की नाही याची पाहणी करावी.

राजापूरकरांना होणारा अशुद्ध पाणीपुरवठा तातडीने थांबवून त्या दोषी असणाऱ्या ग्रामपंचायतप्रशासन आणि ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी संदेश देशमुख, गोपा सोनवणे ऋषिकेश हासे, सागर हासे, रवी हासे, राजु हासे राजेंद्र पानसरे, संजय कडलग व लखन शिरोळे यांनी केली आहे.


## नोकरीची सुवर्णसंधी

**'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'**
**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

**पदे: Field Sales Executive**
**Business Development Manager**
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

**पात्रता**
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

**सुविधा**
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165


## ४८ गावांचे प्रश्न ऐका, मगच इको सेन्सिटिव्ह झोन ! - आ. डॉ. लहामटे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- पश्चिम घाट पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राच्या (इको सेन्सिटिव्ह झोन) प्रस्तावात समाविष्ट असलेल्या अकोले तालुक्यातील ४८ गावांच्या सूचनांवर व सूचनांबाबत आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभागृहात गुरुवारी बैठक पार पडली.

यावेळी तहसीलदार सिद्धार्थ मोरे, गटविकास अधिकारी अमर माने, देवकन्या बोकडे, अनिल पवार, अतुल पवार, तहसीलदार किसन लोहरे, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. पश्चिम घाटातील ४८ गावांच्या सूचनांवर-सूचनांवर मंथन होत शेती, घरबांधणी, विकासकामे व वनहक्कांच्या प्रश्नांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. प्रस्तावित पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रामुळे स्थानिक पातळीवर होणारे संभाव्य परिणाम, गावातील विकासकामे तसेच ग्रामस्थांच्या विविध अडचणींवर विचारविनिमय करण्यात आला. केंद्राच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने २७ जुलै २०२६ रोजी पश्चिम घाट पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राबाबत मसुदा अधिसूचना प्रसिद्ध करून सूचनांवर व सूचना मागविल्या आहेत.

## पाऊस गायब, पिके संकटात !




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील साकूर पठार भागात पावसाने मोठी ओढ दिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, त्याचा थेट फटका खरीप पिकांना बसला आहे. पावसाअभावी साकूर मंडळातील तब्बल ५३.४० टक्के खरीप क्षेत्र बाधित झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत मोठी भर पडली आहे.

साकूर मंडळात यंदाच्या खरीप हंगामात एकूण २२ हजार १४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची लागवड करण्यात आली आहे. त्यापैकी ११ हजार ७५६.५ हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याची नोंद करण्यात आली आहे. एकूण खरीप क्षेत्राच्या तुलनेत बाधित क्षेत्राचे प्रमाण निम्म्याहून अधिक असल्याने साकूर मंडळातील पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची तीव्रता स्पष्ट होत आहे. पठार भागात मागील काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसत आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या नजरा आता आभाळाकडे लागल्या आहेत. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटण्याबरोबरच उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. साकूरसह पठार भागातील अनेक गावांमध्ये खरीप हंगामातील पिके पावसावर अवलंबून आहेत. त्यामुळे पावसाचा खंड आणखी वाढल्यास बाधित क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने बाधित क्षेत्राची पाहणी करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत व दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.


दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait.
Neither DO WE
24 तास सुविधांसाठी
02425 - 224761
मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25